महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

# पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पुणे-२०१९-२०

## पहिली गुणवत्ता यादी दि.१२.०७.२०१९

----

**इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०३.२०१९ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. त्यानुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१९-२० साठी पहिली गुणवत्ता यादी दिनांक १२.०७.२०१९ रोजी सायंकाळी ६.०० वाजता जाहीर झालेली होत आहे, तसेच दि १३.०७.२०१९ व १५.०७.२०१९ सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत व दि. १६.०७.२०१९ सकाळी ११.०० ते ३.०० वाजेपर्यंत अखेर विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कॉलेज मध्ये जाऊन प्रवेश घेणेचा आहे.**

**सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठीची इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या गुणवत्ता जाहिर करतांना केंद्रीय प्रवेश समितीला आनंद होत आहे. इयत्ता ११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होत असल्याबाबत पालकांनी समाधान व्यक्त केले आहे.**

**कला, विज्ञान व वाणिज्य शाखा (मराठी व इंग्रजी माध्यम) साठी जेवढया प्रवेश इच्छुकांनी अर्ज केला होता. त्यांना प्रथम फेरीत शाखा व माध्यमनिहाय आलेल्या प्रवेश अर्जानुसार प्रस्तावित पसंती क्रमांक तपशील खालीलप्रमाणे**

| शाखा | माध्यम | दिलेला प्रवेश | १ ला पसंतीक्रम | २ रा पसंतीक्रम मिळालेले | ३ रा पसंतीक्रम मिळालेले | ०४ था पसंतीक्रम मिळालेले | ०५ वा पसंतीक्रम मिळालेले | ०६ ते १० पसंतीक्रम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कला | मराठी | ३५२२ | २७९३ | ३३३ | १५२ | १०६ | ६४ | ७४ |
| कला | इंग्रजी | १७५९ | ५८४ | ३४८ | २४९ | २०२ | १६४ | २१२ |
| वाणिज्य | मराठी | ७०४२ | ४४१८ | १२३६ | ५१२ | ३७० | २११ | २९५ |
| वाणिज्य | इंग्रजी | १४६४१ | ५७०० | २६९७ | १७३६ | १२३६ | ९८५ | २२८७ |
| विज्ञान | इंग्रजी | २०५६१ | ९७७४ | ३६४८ | २२५९ | १४२२ | १०५० | २४०८ |
| एमसीव्हीसी | इंग्रजी/ हिंदी/उर्दु | ११७६ | १०९५ | ६६ | १५ | ०० | ०० | ०० |
| **एकूण** | | ४८७०१ | २४३६४ | ८३२८ | ४९२३ | ३३३६ | २४७४ | ५२७६ |

**पहिल्या गुणवत्ता यादीची माहिती खालील प्रमाणे:-**

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | एकूण प्राप्त अर्ज | ६३५६६ |
| २ | प्रवेश दिलेल्या (अॅलॉट झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या) | ४८७०१ |
| ३ | प्रथम पसंतीक्रमांक मिळालेल्या विद्यार्थी संख्या | २४३६४ |
| ४ | प्रवेश न मिळालेली विद्यार्थी संख्या | १४८६५ |



Scanned by CamScanner

पहिल्या गुणवत्ता यादीमध्ये ॲलॉट झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश देण्याचे वेळापत्रक पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रवेश प्रक्रियेबाबत तपशिल |
|---|---|---|---|
| १ | १२.०७.२०१९ | सायं. ६.०० वाजता | केंद्रीय प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी जाहिर करणे |
| २ | १३.०७.२०१९<br>व १५.०७.२०१९<br>१६.०७.२०१९ | स.११.०० ते सायं. ५.००<br>स.११.०० ते सायं. ५.००<br>स.११.०० ते सायं. ३.०० | केंद्रीय प्रवेशाच्या पहिल्या गुणवत्ता यादीतील प्रवेश |
| ३ | १६.०७.२०१९ | सायं. ७.०० वाजता | पहिल्या गुणवत्ता यादीचे कटऑफ व दुस-या गुणवत्ता यादीसाठी उपलब्ध जागा |

**विद्यार्थी पालकांसाठी सूचनाः-**

१) पसंतीक्रम क्र-१ ॲलॉट झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रथम Student login मध्ये जाऊन Proceed या बटणावर क्लिक करणे गरजेचे आहे, तरच त्यांचे नांव कॉलेजच्या यादीमध्ये समाविष्ट होईल व त्यानंतर कॉलेजमध्ये प्रत्यक्ष जाऊन आवश्यक कागदपत्रे देऊन प्रवेश ऑनलाईन अपलोड करुन प्रवेश निश्चित करावा व प्रवेश मिळाल्याची प्रिंट घ्यावी. आपल्या पसंतीचे कनिष्ठ महाविद्यालय मिळालेले असल्यामुळे **दि १३.०७.२०१९ व १५.०७.२०१९ सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत व दि. १६.०७.२०१९ सकाळी ११.०० ते ३.०० वाजेपर्यंत** कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश ऑनलाईन निश्चित करणे बंधनकारक आहे. जे विद्यार्थी १ ल्या पसंतीक्रमाचे कनिष्ठ महाविद्यालय ॲलॉट झालेले असतांना देखील प्रवेश घेणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना पुढील नियमित तिस-या फेरीपर्यंत त्यांचा इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा क्रमांक व इ.१० वी बोर्डाचा बैठक क्रमांक(Seat No.) प्रतिबंधीत (Block)केले जाणार आहे.

२) पसंतीक्रमांक २ ते १० पैकी कोणत्याही क्रमांकाचे कॉलेज मिळालेले आहे, त्यांनी प्रथम Student login मध्ये जाऊन Proceed या बटणावर क्लिक करणे गरजेचे आहे, तरच त्यांचे नांव कॉलेजच्या यादीमध्ये समाविष्ट होईल व त्यानंतर कॉलेजमध्ये प्रत्यक्ष जाऊन आवश्यक कागदपत्रे देऊन प्रवेश ऑनलाईन अपलोड करुन प्रवेश निश्चित करावा व प्रवेश मिळाल्याची प्रिंट घ्यावी.

३) पसंतीक्रमांक २ ते १० ॲलॉट झालेल्या विद्यार्थ्यांना जर तो प्रवेश मान्य नसेल तर अशा विद्यार्थ्यांनी दुस-या गुणवत्ता यादीची वाट पाहावी. ॲलॉट झालेला प्रवेश तात्पुरत्या स्वरुपात घेणे अथवा कॉलेज मध्ये जाऊन प्रवेश रद्द करणे अशा कोणत्याही कार्यवाहीची आवश्यकता नाही.

४) पसंतीक्रमांक २ ते १० पैकी कोणत्याही पसंतीक्रमांकाचे कॉलेज ॲलॉट झालेले असल्यास व कॉलेज मध्ये जाऊन प्रवेश घेतलेला असल्यास व नंतर प्रवेश काही कारणास्तव रद्द (Cancelled) केला असल्यास अशाही विद्यार्थ्यांचा इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा क्रमांक व इ.१० वी बोर्डाचा बैठक क्रमांक(Seat No.) प्रतिबंधीत (Block)केले जाणार आहेत. त्यामुळे प्रवेश घ्यावयाचा आहे किंवा नाही हे पालक व विद्यार्थी यांनी विचारपुर्वक ठरवुनच निर्णय घ्यावा. त्यानंतर कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५) प्रवेशाच्या वेळी आवश्यक ती कागदपत्रे विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक आहे.



Scanned by CamScanner

६) ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश ॲलॉट झालेले नाहीत त्यांना पुढील फेरीत गुणवत्ता व वैधानिक आरक्षणानुसार उपलब्ध जागेवर प्रवेश मिळतील. तरी अशा विद्यार्थ्यांनी पुढील फेरीची वाट पाहावी.

**कनिष्ठ महाविद्यालयांसाठी सूचना :-**

१) आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात ऑनलाईन ॲलॉट झालेल्या यादीप्रमाणे विद्यार्थी/पालक कॉलेजमध्ये आल्यानंतरच त्यांचे प्रवेश नियोजित वेळेत ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.

२) विद्यार्थी किंवा पालक कॉलेज मध्ये प्रवेशासाठी न आल्यास, आवश्यक ती कागदपत्रे सादर न करताच कोणत्याही विद्यार्थ्याला परस्पर ऑनलाईन ॲडमिट करु नये.

३) विद्यार्थी/पालक यांचा प्रवेश घेणेबाबतचा निर्णय निश्चित असेल तरच आवश्यक कागदपत्रे घेवून (उदा- मूळ दाखला, गुणपत्रक इ. ) ऑनलाईन प्रवेश अपलोड करावेत. संपूर्ण फी भरण्याची सक्ती करण्यात येऊ नये. विहित वेळेत प्रवेश ऑनलाईन अपलोड न केल्यास तसेच आर्थिक कारणासाठी विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी संबधित महाविद्यालयाच्या प्राचार्य यांची राहील.

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(मिनाक्षी राऊत)
अध्यक्ष,
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
प्र.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१



Scanned by CamScanner